


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : १४२ वा गुरूवार दि. १० जुलै २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# आमदार निवासाच्या कॅन्टिन चालकावर ची कारवाई, निकृष्ट दर्जाच्या जेवणामुळे परवाना निलंबित...

## महाराष्ट्रात प्लास्टिक पिशवीवर बंदी तर मंत्रालयातील कॅन्टीनमध्ये खुले आम...

वृत्तसंस्था/मुंबई

आकाशवाणी आमदार निवासातील मारहाण प्रकरणी मोठी बातमी समोर येत आहे. दिवसभरातील नाट्यमय घडामोडींनंतर आता आमदार निवास कॅन्टिनमधील अजंता केटरर्सचा परवाना निलंबित करण्यात आला आहे. निकृष्ट दर्जाचे जेवण दिल्यामुळे संजय गायकवाड यांनी कॅन्टीन चालकाला मारहाण केली होती. हा विषय विधिमंडळातही गाजला. मारहाणीच्या प्रकारानंतर कॅन्टीनमधील पदार्थांची एफडीएने तपासणी केली. त्यानंतर ही निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. मंगळवारी रात्री कॅन्टिनमध्ये निकृष्ट जेवण मिळाल्याने शिंदेसेनेचे आमदार संजय गायकवाडांनी कर्मचाऱ्याला मारहाण केली. संजय गायकवाड यांचा मारहाण करतानाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. यानंतर कॅन्टिनच्या जेवणाच्या गुणवत्तेवर प्रश्न तर उपस्थित झालाच पण गायकवाडांवर देखील टीकेची झोड उठली. त्यानंतर अन्न आणि औषध प्रशासनाचे पथक दाखल कॅन्टिनमध्ये दाखल झाले. अधिकाऱ्यांकडून आमदार निवासाच्या कॅन्टिनमधील स्टोअर रूमची तपासणी करण्यात आली.तपासणीदरम्यान खाद्यपदार्थ आणि तेलाच्या बाटल्यांचे सॅम्पल नमूने घेतले. हे सगळे नमून सील करण्यात आले. तपासणीसाठी पुढे फॉरेन्सिक लॅबला पाठवण्यात आले. यातच स्टोअर रूमचं ऑडिटही झाल. या तपासणीचा अहवाल लवकरच सादर करण्यात येईल. विधीमंडळाचं अधिवेशन सुरु असल्याने आमदार संजय गायकवाड हे आमदार निवासमध्ये वास्तव्यास आहेत. रात्रीचे जेवण कॅन्टीनला करत होते. मात्र त्यावेळी त्यांना देण्यात आलेली डाळ ही निकृष्ट दर्जाची होती. डाळीचा वास येत असल्याने ते संतापले आणि कॅन्टिन चालकाला धारेवर धरले, तसेच मारहाणही केली. या सर्व प्रकाराचा व्हिडिओ व्हायरल झाला. सुरूवातीला गायकवाड काऊन्टरजवळ गेले आणि कॅन्टीन व्यवस्थापकाला त्यांनी बोलावलं. त्यावेळी त्याला गायकवाडांनी





खराब डाळीचा वास घ्यायला लावला. तेव्हा त्यानेही डाळ खराब असल्याचं मान्य केलं, असं व्हिडीओमध्ये दिसून येते. संजय गायकवाडांचा पारा चांगलाच चढला होता. गायकवाडांनी कॅन्टीन व्यवस्थापकाला मारण्यास सुरुवात केली. आजू-बाजूच्यांनी त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला. पण ते काही थांबले नाहीत. त्यासोबतच फूड डिपार्टमेंटकडे ती डाळ पाठवायला सांगितली. हा मुद्दा विधिमंडळातही गाजला. त्यानंतर अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी तपासणी करत कॅन्टीन चालकावर कारवाई केली आहे.

---

# जिल्हा परिषद पटसंख्या जास्त असून सुद्धा शिक्षक नाही...

## जिल्हा परिषद शिक्षणासाठी आपले पाल्य शिकले पाहिजे या उद्देशाने शिक्षक न दिल्यास पालकांचे शाळा बंद आंदोलन करण्याचा इशारा

जनसंचलन/ जानेफळ

मेहकर तालुक्यातील सर्वात शेवटचे गाव म्हटले तर मोहना बु हे गाव येथे शिक्षणाचा अभाव असून इथता पहिली ते आठवीपर्यंत शिक्षण असून परंतु शिक्षण वर्गासाठी तिनच शिक्षक कार्यरत आहे आणखीन दोन शिक्षक कार्यरत करावे अशी पालक वर्गाची व शाळा समिती अध्यक्ष उपाध्यक्ष यांची मागणी होत आहे दोन दिवसात शिक्षक न दिल्यास शाळा बंद करण्याचा आंदोलन पालकांनी इशारा दिला आहे बरेच वेळेस यांना बऱ्याच वेळा निवेदन देऊन सुद्धा आत्तापर्यंत शिक्षक उपलब्ध करून दिले नाही व एक ते आठ वर्ग असताना सुद्धा शिक्षक संख्या फक्त तीन आहे त्यामुळे दोन शिक्षक लवकरात लवकर उपलब्ध करून देण्यात यावे नाहीतर शाळा बंद आंदोलन करण्याचे इशारा शाळा समिती अध्यक्ष उपाध्यक्ष व मुख्याध्यापक यांनी केला आहे



# एसपी निलेश तांबेची धडाकेबाज कारवाई!

जनसंचलन/धाड

जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या आदेशाने अवैध धंद्यांनाआळा घालण्याचे फार्मन सुटल्यापासून, सर्वच पोलीस विभाग सतर्क झाले असून, कारवाई करण्यासाठी सज्ज झालेत.दरम्यान धामणगाव बडे पोलीस स्टेशन अंतर्गत प्रतिबंधक गुटखा कारवाई करण्यात आली असून,तब्बल दोन लाख ८९ रुपयांचा गुटखा हस्तगत करण्यात आला आहे.ही करावी ८ जुलै रोजी करण्यात आली. शहरासह जिल्ह्यात अवैध धंदे अद्यापही फोफावले आहेत.पोलीस प्रशासनाला बरीच कसरत करावी लागणार आहे.जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे आल्यापासून ते आपल्या धडाकेबाज कारवाईचा



परिचय देत आहेत.काल देखील धामणगाव बढे पोलीस स्टेशन हद्दीत अवैध गुटखा जप्तीची कारवाई करून एका आरोपीला अटक करण्यात आली.याप्रकरणी २,८९,८४०रुपयांचा मुद्देमाल व एक पांढऱ्या रंगाची ५,००,०००किमतीची बोलेरो असा एकूण ७,८९,८४०रुपयांचा मध्यमान हस्तगत करण्यात आला आहे. शेख चांद,गणेश पाटील, गजानन गोरले या पथकाने ही कारवाइ केली

# संधी आणि आव्हाने

## संपादकीय लेख

पहलगाम हल्ल्याचा स्पष्ट शब्दांत निषेध, दहशतवादाविरोधात शून्य सहनशीलतेचे धोरण आणि ङ्गग्लोबल साउथफ देशांचा आवाज बळकट करण्यातील प्रगती, हे ब्राझीलमध्ये पार पडलेल्या ङ्गब्रिक्सफ परिषदेचे भारताच्या दृष्टीने मोठे फलित आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ङ्गब्रिक्सफ देशांना दिलेल्या आयातशुल्काच्या धमकीच्या पार्श्वभूमीवर, आर्थिक सहकार्याच्या आघाडीवर या परिषदेचा परिणाम मर्यादित राहिला. मात्र, शांघाय सहकार्य परिषदेत (एससीओ) दहशतवादाविरोधात ठाम संयुक्त भूमिका मांडण्यातील कसर येथे भरून निघाली. ङ्गदहशतवादाला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पाठिंबा देणाऱ्यांना किंमत मोजावी लागेल,फ हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेला इशारा, हेदेखील ङ्गब्रिक्सफ परिषदेचे ठळक वैशिष्ट्य ठरले. जगभरात सुरू असलेल्या संघर्षांबाबत ङ्गगंभीर चिंताफ व्यक्त करणाऱ्या संयुक्त निवेदनामागील भारताची संतुलित भूमिकाही जागतिक परिस्थितीशी सुसंगत ठरली. पहलगाम हल्ला आणि ङ्गऑपरेशन सिंदूरफ नंतर भारत सातत्याने दहशतवादाच्या विरोधात जागतिक व्यासपीठांवर आक्रमकपणे आवाज उठवत असून, अनेक देशांचा आपल्याला पाठिंबा मिळत आहे. ब्रिक्स परिषदेतही पंतप्रधान मोदी यांनी ङ्गदहशतवादाचा निषेध, ही आपली सोयिस्कर भूमिका न मानता तो सिद्धान्त म्हणून स्वीकारला पाहिजे,फ असे स्पष्टपणे सर्व राष्ट्रांना बजावले. त्याचाच परिणाम म्हणून पहलगाम हल्ल्याचा निषेध आणि दहशतवाविरोधात शून्य सहनशीलतेचे धोरण, या मुद्द्यावर परिषदेत सहमती घडून आली आहे. विशेषत: पाकिस्तानची पाठराखण करणाऱ्या चीनचाही या भूमिकेतील सहभाग, हे भारताचे राजनैतिक यश म्हणावे लागेल. रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांची वेगवेगळ्या कारणामुळे या परिषदेतील गैरहजेरी चर्चेचा विषय ठरली; त्यामुळे परिषदेच्या प्रभावावर मर्यादा आल्या असल्या, तरी एका अर्थाने ही बाब भारताच्या पथ्यावर पडली, असे म्हणता येईल. या संधीचा पंतप्रधानांनी पुरेपूर लाभ उठवून काही मुद्द्यांवर आक्रमक, तर काही विषयांवर संतुलित भूमिका परिषदेच्या केंद्रस्थानी आणली. या निमित्ताने ब्राझीलशी सहकार्य वाढविण्याच्या दृष्टीने भारताने दोन पावले पुढे टाकली; तसेच अर्जेंटिनाचे पंतप्रधान झेविअर मिलेई यांच्याशी झालेल्या त्यांच्या चर्चेत संरक्षण, खनिजे, औषधनिर्मिती आणि ऊर्जा या क्षेत्रांतील सहकार्य वाढीस लागण्यास मदत होणार आहे. सोबतच ङ्गग्लोबल साउथफ देशांचा आवाज मोदी यांनी या व्यासपीठावरही जोरकसपणे मांडला. या विषयावरील प्रस्थापितांची भूमिका म्हणजे ङ्गनेटवर्क नसलेला मोबाइलफ असल्याच्या त्यांच्या उल्लेखासही मोठी दाद मिळाली. जागतिक तापमानवाढ, विकास, सुरक्षा आणि साधनसंपत्तीचे वितरण यांबाबत विकसित देशांच्या दुहेरी भूमिकेकडे त्यांनी अंगुलीनिर्देश केला आणि जागतिक व्यासपीठांच्या निर्णयप्रक्रियेत या देशांना संधी मिळाली पाहिजे, या भूमिकेचा पुनरुच्चार केला. त्याबरोबरच ङ्गब्रिक्स स्टार्टअप फोरमफच्या स्थापनेचा निर्णयही नवोन्मेष आणि उद्योजकतेला चालना देणारा ठरेल. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे सातत्याने ङ्गअमेरिका फर्स्टफचा राग आळवत असले, तरी अमेरिका जगाच्या फौजदाराच्या भूमिकेतून बाहेर येण्यास तयार नाही, हे या परिषदेच्या निमित्ताने पुन्हा दिसून आले. आताही ङ्गब्रिक्सफ देशांवर दहा टक्के अतिरिक्त आयातशुल्क लादण्याच्या त्यांच्या धमकीचे सावट रिओ दी जानिरोमधील परिषदेवर होते. या अप्रत्यक्ष दबावामुळेच डॉलरला भविष्यात पर्याय ठरू शकेल, अशा ङ्गब्रिक्सफ चलनाचा प्रस्ताव पुढे सरकू शकला नाही. स्थानिक चलनांमध्ये व्यापाराला प्रोत्साहन देतानाच आपला हेतू अमेरिकाविरोधी नाही, असे स्पष्टीकरण त्यामुळेच जोडावे लागले आहे. खुद्द चीननेही ङ्गआमचा कोणाशीही संघर्ष नाही आणि कोणीही आमचे लक्ष्य नाही,फ अशी भूमिका घेत जपूनच पावले टाकण्याचे धोरण स्वीकारले आहे. अमेरिकेने इराणवर केलेल्या हल्ल्यांबाबत ङ्गगंभीर चिंताफ व्यक्त करण्यातही याच सावधगिरीचे प्रतिबिंब पडल्याचे दिसते. या संतुलित भूमिकेबाबत सहमती घडविण्यातही भारताचा वाटा आहे. भारत-चीन; तसेच इराण-सौदी अरेबिया असे तणावपूर्ण संबंध, हे आर्थिक धोरणातील सहमतीच्या मार्गातील अडथळे ठरत आहेत. बदलत्या जागतिक रचनेमध्ये आपल्या हितसंबंधांना प्राधान्य देऊनच जागतिक भूमिका निश्चित करण्याचा सर्वच देशांचा पवित्रा आहे. त्या पार्श्वभूमीवर ङ्गब्रिक्सफ हे बहुपक्षवाद आणि शांततापूर्ण सहअस्तित्वावर आधारित व्यासपीठ ठरावे, अशी अपेक्षा व्यक्त झाली असली, तरी पश्चिमेचा प्रभाव रोखण्यासाठी आणखी मोठा पल्ला गाठावयाचा आहे, हे ब्राझील परिषदेतून अधोरेखित झाले.

# अंगावर पेट्रोल ओतून स्वत:ला पेटवत डॉक्टरची आत्महत्या



**जनसंचलन/ खामगाव**

जळगाव जामोद तालुक्यातील पिंपळगाव काळे येथील खासगी पशुवैद्यकीय डॉ. चंद्रकांत विश्वासराव अवचार (वय ६८, रा. जळगाव जामोद) यांनी अंगावर पेट्रोल ओतून स्वत:ला पेटवत आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना मंगळवारी (९ जुलै) सकाळी ९ वाजता निमगाव फाट्याजवळ उघडकीस आली. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. डॉ. अवचार यांनी नेमक्या कोणत्या कारणामुळे टोकाचे पाऊल उचलले, हे अद्याप स्पष्ट होऊ शकलेले नाही. पशुवैद्यकीय डॉ. चंद्रकांत अवचार यांनी अंगावर पेट्रोल ओतून स्वत:ला पेटविल्याच्या घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ ओम साई फाऊंडेशनच्या रुग्णवाहिकेला पाचारण केले. फाऊंडेशनचे कार्यकर्ते घटनास्थळी दाखल झाले आणि गंभीररित्या भाजलेल्या डॉ. अवचार यांना तत्काळ खामगाव येथील सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, प्रकृती चिंताजनक असल्याने प्राथमिक उपचारानंतर त्यांना अकोला येथील सर्वो पचार रुग्णालयात हलविण्यात आले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच नांदुरा पोलीस स्टेशनचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. यावेळी पोलीस कर्मचारी गजानन इंगळे, कैलास सुरडकर, ज्ञानेश्वर वाघमारे आणि पंकज डाबेराव यांनी पंचनामा केला. या प्रकरणाचा पुढील तपास नांदुरा पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# झारखंडचे खासदार निशिकांत दुबे यांची खासदारकी रद्द करून कठोर शासन करा -डॉ. गोपाल बछिरे

**जनसंचलन/ लोणार**



खासदार निशिकांत दुबे यांनी बनावट खोटी एमबीए ची डिग्री संसदेत सादर केली व महाराष्ट्र विषयी वल्गना करून महाराष्ट्राचा तसेच मराठी माणसाचा अपमान केल्याबद्दल त्यांची खासदारकी रद्द करून कठोर शासन करण्यात यावी अशी मागणी शिवसेना उ.बा.ठा. चे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे यांनी राष्ट्रपती यांच्याकडे निवेदना द्वारे करण्यात आली झारखंड चे खासदार निशिकांत दुबे यानी एक तर आपले शिक्षणएम.बी.ए.असल्याचे संसदेत लेखीप्रतिज्ञापत्र दिलेआहे वही डिग्री दिल्ली विद्यापीठाची असल्याचे शपथेवरशपत पत्रातसांगितेले,पण ही डिग्री खोटी बनावट असल्याचे स्वतः दिल्ली विद्यापीठानेच स्पष्ट केलेआहे.या खासदारानेसंसदेची फसवणूक केल्याबद्दलत्याचे संसद सदस्यत्व रद्द होणे क्रमप्राप्त आहे.त्याचबरोबर निशिकांत दुबे यांनीपरवामहाराष्ट्रा विषयी जी गरळओळखली त्यात तो म्हणाला ङ्गमहाराष्ट्रात काहीहीशिल्लकराहिलेलं नाहीमहाराष्ट्र कंगाल झालेला आहे,महाराष्ट्राच संपूर्ण वैभव संपलेल आहे, येथेकोणता मोठा उद्योग नाही,आमच्या श्रीमंतीवर तुम्ही मराठी माणसेव महाराष्ट्रजगत आहे,तुम्ही मराठी मानसमहाराष्ट्र बाहेर आलेतर मराठी माणसांना आपटून आपटून मारूत निशिकांतदुबे चे हे विधानभारतात सर्वात जास्त जीएसटी रूपाने कर देणारा एकमेव राज्याचा व छत्रपती शिवाजी महाराज, शाहू,फुले, आंबेडकरांचा वारसा असलेल्यामहाराष्ट्राचा घोर अपमान करणारे आहे आणि म्हणूनखासदारनिशिकांत दुबे याचे संसद सदस्य पद रद्द करून त्याला कठोर शासन व्हावे अन्यथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असे निवेदन लोणारचे तहसीलदार मा. भूषण पाटील यांच्यामार्फत महामहिम राष्ट्रपती यांना देण्यात आले आहेयाप्रसंगी शिवसेना उभाठाचे जिल्हा संघटक प्रा.डॉ.गोपालसिंह बछिरे, तालुकाप्रमुख ॲड.दीपक मापारी, शहरप्रमुख गजानन जाधव, महिला तालुकाप्रमुख सौ. तारामती जायभाये,तालुका उपप्रमुख लीलाताई मते,ज्येष्ठ शिवसैनिक सुदन अंभोरे , प्रकाश सानप,शाम राऊत, शहर संघटक तानाजी मापारीशहरउपप्रमुखलूकमान कुरेशी युवा सेना शहरप्रमुख श्रीकांत मदनकर, विभाग प्रमुख गोपाल मापारी, तानाजी अंभोरे, अल्पसंख्यांक सेनेचे इकबाल कुरेशी, अशपाक खान, फहीम खान, वाहतूक सेनेचे असुबा धारकर,गफ्फार शाह, लालूभाई शेख, वासिम शेख, अमोल सुटे, विजय घोडके,भारत राठोड , शमीम शेख, कलीम कुरेशी नदीम कुरेशी, मंगेश मोरे, यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थितहोते

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# थंड पाणी, बोचरा वारा आणि कठीण चढाईचं आव्हान; सैयामी खेरने वर्षभरात दुसऱ्यांदा रचला जबरदस्त रेकॉर्ड...

बॉलिवूडमध्ये अनेक क्रीडाप्रेमी कलाकार आहेत. विशेषत: क्रिकेटप्रेमींची सख्या जास्त आहे. त्यांच्यापैकी एक असलेली अभिनेत्री सैयामी खेर ही क्रिकेट खेळाची भक्त आहे, असं म्हणणं वावगं ठरणार नाही. तिचं क्रीडाप्रेम सर्वश्रुत आहे. त्यात ती वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये आणि मॅरेथॉनमध्ये भाग घेत असते, यासाठी तिचे चाहते तिचं तोंडभरून कौतुक करत असतात. अलीकडेच ती आयर्नमॅन या स्पर्धेत सहभागी झाली होती.आयर्नमॅन २०२५ ही स्पर्धा स्वीडनच्या जोनकोपिंग येथे पार पाडली. ७०.३ ट्रायथलॉन अभिनेत्रीने यशस्वीरीत्या पूर्ण केली. या स्पर्धेत एका दिवसांत १.९ किमी स्विमिंग, ९० किमी सायकलिंग आणि २१.१ अर्ध मॅरेथॉन धावायची असते.



थंड पाणी, बोचरा वारा आणि कठीण चढाई अशी आव्हानं पार करत सैयामीनं स्पर्धा ३२ मिनिटं आधीच पूर्ण केलीया अनुभवाबद्दल सैयामी खेरने अशी प्रतिक्रिया दिली की, मी स्वतःच्या क्षमता सिद्ध करण्यासाठी या स्पर्धेत भाग घेत नाही. तर माझ्यातल्या क्रीडाप्रेमासाठी यात सहभागी होत असते. मागच्या वेळेपेक्षा अधिक चांगली कामगिरी करून दाखवायची हाच माझा उद्देश आहे.

महिला मासिक पाळी दरम्यान अनेक आव्हानांना सामोरं जातात. पण शरीरापेक्षा मेंदूतून सगळ्याला सामोरं जाता येतं. विविध क्रीडा प्रकारांमुळे माझा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. दरम्यान गेल्या वर्षीही तिनं या स्पर्धेत सहभागी होत, पदकाची कमाई केली होती. एका वर्षभरात दोनदा आयर्नमॅन स्पर्धा पूर्ण करणारी ती पहिली भारतीय अभिनेत्री ठरली आहे. सैयामी नेहमीच खेळासह मानसिक आरोग्य जपण्यास प्राधान्य देण्याचा सल्ला देत असते. तिनं मिळवलेलं हे यश भारतीयांसाठी अभिमानाचा क्षण आहे.

---

# बुमराहला संघात घेण्यासाठी कोणाची विकेट काढणार, गंभीर यांच्यापुढे तीन पर्याय कोणते...



**लंडन :** लॉर्ड्सवर होणाऱ्या तिसऱ्या कसोटी सामन्यात जसप्रीत बुमराहला संधी देणार, हे जवळपास निश्चित झाले आहे. पण जर बुमराहला संधी द्यायची असेल तर त्यासाठी कोणाला बाहेर काढायचं, हा मोठा प्रश्न भारतीय संघापुढे होता. कारण विजयानंतर शक्यतो संघ बदलत नाहीत. पण गौतम गंभीर यांचा मास्टरप्लॅन तयार झाला आहे. बुमराहला संघात स्थान देण्यासाछी आता तीन पर्याय समोर आले आहेत. त्यामुळे आता बुमराहला आता कोणाच्या जागी संधी द्यायची हे गंभीर यांनी ठरवलं आहे. जसप्रीत बुमराहला जेव्हा दुसऱ्या कसोटीसाठी संघाबाहेर करण्यात आले तेव्हा कोणाला संधी द्यायची, यासाठी दोन पर्याय होते. बुमराहच्या जागी अर्शदीप सिंग आणि आकाश दीप असे दोन पर्याय भारतीय संघापुढे होते. पण भारतीय संघाने आकाश दीपची निवड केली. त्यामुळे आता जर बुमराहला संघात स्थान द्यायचे असेल तर आकाश दीपला संघाबाहेर केले जाऊ शकते. कारण बुमराहच्या जागी तोच संघात आला होता.आकाश दीपने दुसऱ्या कसोटीत दमदार गोलंदाजी करत १० विकेट्स मिळवल्या होत्या. त्यामुळे आकाश दीपला संघाबाहेर केले तर त्याच्यावर अन्याय होईल. त्यामुळे दुसऱ्या कसोटीत जो गोलंदाज अपयशी ठरला होता, त्याला संघाबाहेर केले जाऊ शकते. दुसऱ्या कसोटीत आकाश दीप आणि जसप्रीत बुमराह यांनी दमदार गोलंदाजी केली होती. त्यामुळे हे दोघे संघात कायम राहतील. पण जर बुमराहला संघात स्थान द्यायचे असेल तर त्यासाठी प्रसिध कृष्णाला संघाबाहेर केले जाऊ शकते. कारण प्रसिधला आतापर्यंत संधी दिली असली तरी त्याला अपेक्षित कामगिरी करता आलेली नाही. त्यामुळे त्याला संघाबाहेर केले जाऊ शकते. जर भारताला आकाश दीप आणि प्रसिध कृष्णा या दोघांनाही संघात ठेवायचे असेल तर त्यासाठी कोणाला संघाबाहेर करायचे, याचा तिसरा पर्यायही भारतीय संघापुढे खुला आहे. बुमराहला संघात घेण्यासाठी नितीश कुमार रेड्डीला संघाबाहेर केले जाऊ शकते. कारण गेल्या सामन्यात त्याला फलंदाजी असो किंवा गोलंदाजी, आपली छाप पाडताआली नव्हती. त्यामुळे नितीश कुमारला संघाबाहेर करत बुमराहला संघात स्थान देण्यात येऊ शकते. पण प्रसिध कृष्णाला संघाबाहेर करत जसप्रीत बुमराहला संघात स्थान देण्याची शक्यता सर्वात जास्त आहे.तिसऱ्या कसोटीसाठी भारताला संघात बदल तर करायचे आहेत, पण कोणाला संघाबाहेर करायचे, हे अद्याप समोर आलेले नाही. त्यामुळे बुमराहला संघात स्थान देताना कोणत्या खेळाडूला संघाबाहेर केले जाते, याकडे आता सर्वांचे लक्ष असेल.

# जे घडलं ते खूप वाईट... लता सबरवाल यांच्यासोबतच्या घटस्फोटावर संजीव सेठ यांनी दिली प्रतिक्रिया..



**मुंबई -** लोकप्रिय टीव्ही कपल संजीव सेठ आणि लता सबरवाल यांनी लग्नाच्या १६ वर्षानंतर घटस्फोट घेतला आहे. लता सबरवाल यांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये घटस्फोटाची बातमी दिली होती आणि चाहत्यांना प्रायव्हसी देण्याची विनंती केली होती. पण चाहत्यांना जाणून घ्यायचं होतं की, लता आणि संजीव यांच्यात नेमकं काय घडलं? ज्यामुळे त्यांचा घटस्फोट झाला. अशातच आता संजीव सेठ यांनी घटस्फोटावर प्रतिक्रिया दिली आहे.संजीव सेठ यांचं लता सबरवाल यांच्यासोबत दुसरं लग्न होतं. दोघांनी २०१० मध्ये लग्न केलं, पण हल्लीच त्यांनी घटस्फोटाची घोषणा केली. त्याआधी संजीव सेठ यांचं अभिनेत्री रेशम टिपणीससोबत लग्न झालं होतं, पण २००४ मध्ये त्यांचा घटस्फोट झाला. संजीव सेठ आणि लता सबरवाल यांना एक मुलगा आहे. रेशम टिपणीसपासून त्यांना दोन मुलं आहेतलता सबरवाल यांच्यासोबतच्या घटस्फोटाबद्दल बॉम्बे टाईम्ससोबत बोलताना संजीव सेठ म्हणाले की, आमच्या लग्नाला १६ वर्षे झाली आहेत आणि जे घडलं ते खूप वाईट आहे. पण मी त्यावर रडू शकत नाही. आयुष्य पुढे सरकत राहतं आणि मला पुढे जायचं आहेसंजीव सेठ पुढे म्हणाले, ङ्गमी सध्या माझ्या कामावर लक्ष केंद्रित करत आहे. सध्या, मला माझ्या मुलांसोबत वेळ घालवायचा आहे आणि माझ्या भविष्यातील आयुष्यावर लक्ष केंद्रित करायचं आहे.दरम्यान, लता सबरवाल यांनी २२ जून रोजी एका इन्स्टाग्राम पोस्टमध्ये त्यांच्या घटस्फोटाबद्दल सांगितलं होतं. लता यांनी लिहिलं होतं की, ती आणि संजीव सेठ वेगळे होत आहेत. लता यांनी म्हटलं होतं की, मी आज जाहीर करते की मी आणि पती संजीव सेठ आम्ही वेगळं होण्याचा निर्णय घेतला आहे. मला त्यांच्यापासून प्रेमळ मुलगा झाला त्यासाठी त्यांचे आभार. तसंच त्यांना भविष्यासाठी शुभेच्छासंजीव सेठ यांच्या वर्क फ्रंटबद्दल सांगायचं तर, ते सध्या टीव्ही शो झनक मध्ये दिसत आहेत. ते ५ वर्षांच्या ब्रेकनंतर टीव्हीवर परतले आहेत. यापूर्वी ते २०२० मध्ये ये रिश्ता है प्यार के या टीव्ही शोचा भाग होते. संजीव यांनी सांगितलं की, त्यांना मुलीच्या वडिलांची भूमिका साकारण्याचा कंटाळा आला होता आणि म्हणूनच ब्रेक घेतला. अभिनयाव्यतिरिक्त, संजीव सेठ व्लॉग करतात आणि त्याचबरोबर त्यांना फिरण्याचीही आवड आहे.

# गुरुदक्षिणा सोडाच, रोहित शर्मा आपल्या गुरुंनाच विसरला, कार्यक्रमात साधं नावही घेत नाही...

**मुंबई :** आपल्याला ज्यांनी घडवलं, त्या गुरुंना वंदन करायचा, त्यांना गुरुदक्षिणा द्यायचा दिवस म्हणजे गुरुपौर्णिमा. पण गुरुदक्षिणा तर सोडाच, भारताचा स्टार क्रिकेटर आणि वनडे कर्णधार रोहित शर्मा आपल्या गुरुंनाच विसरल्याचे आता समोर येत आहे.

रोहित शर्मा हा गोलंदाज होता, त्याला फलंदाज बनवला तो त्याचे प्रशिक्षक दिनेश लाड यांनी, कारण लाड सरांनीच त्याच्यातला फलंदाज घडवला. रोहितला दिनशे लाड यांनी शाळेत प्रवेश मिळवून दिला. पण त्याच्या कुटुंबियांकडे शाळेचे शुल्क भरण्यासाठी पैसेही नव्हते. त्यावेळी दिनेश लाड यांनी रोहित






शर्माला शाळेत विनंती करून फ्री शिप मिळवून दिली. जेव्हा २०११ साली रोहित शर्माला भारताच्या वर्ल्ड कप संघामधून वगळण्यात आलं होतं. त्यावेळी रोहित शर्मा हा दिनेश लाड सरांकडेच सल्ला मागण्यासाठी गेला होता. दिनेश लाड यांनी रोहित शर्माला त्यावेळी एक सल्ला दिला आणि त्यानंतर त्याने मागे वळून पाहिलंच नाही. रोहित शर्मा भारताचा कर्णधार झाला, चॅम्पियन्स ट्रॉफी, टी वर्ल्ड कप जिंकला. पण आपल्या गुरुंना मात्र तो विसरल्याचे आता समोर येत आहे.रोहित शर्माकडून दिनेश लाड यांनी कधीही फी घेतली नाही. दिनेश लाड हे सर्वांनाच विनाशुल्क शिकवतात आणि खेळाडू घडवतात. ज्या मुलांची परिस्थिती बिकट आहे, पण गुणवत्ता ठासून भरलेली आहे अशा १५ होतकरु खेळाडूंना दिनेश लाड यांनी आपल्या फाऊंडेशनच्या माध्यमातून दत्तक घेतलं आहे. या मुलांसाठी त्यांना दहिसर येथे मैदानही मिळालं आहे. पण त्यासाठी त्यांना महिन्याचा खर्च हा ८-९ लाख एवढा येत आहे. दिनेश लाड सर मोफत शिकवतात, त्यामुळे त्यांच्या गाठीशी एवढी रक्कम नाही. पण रोहित शर्मासारखा नाव, प्रसिद्धी, पैसा अपाम कमावलेला खेळाडू हा त्यांना कोणतीच मदत करत नसल्याचे समोर आले आहे. रोहित शर्माला त्यावेळी दिनेश लाड यांनी सर्वतोपरी मदत केली, पण आता रोहित शर्मा मात्र आपल्या गुरुंनाच विसरल्याचे समोर आले आहे. रोहित शर्माच्या नावाचा स्टँड वानखेडे स्टेडियमवर झाला. पण या कार्यक्रमात रोहित शर्माने आपल्या गुरुंचं नावही घेतलं नाही. त्यामुळे रोहित शर्माला आपल्याला घडवणाऱ्या गुरुंचाच विसर पडल्याची चर्चा सर्वत्र सुरु झाली होती.युवा खेळाडूंना घडवण्यासाठी दिनेश लाड सरांची धावपळ सुरु आहे. पैसा कमावणे तर दूरच ते आपल्या खिशातमधून पैसे भरुन या खेळाडूंना घडवत आहेत.

पण रोहित शर्मासारख्या दिग्गज खेळाडूला आपल्या गुरुंचाच विसर पडला, अशी खंत क्रिकेट वर्तुळात सुरु झाली आहे.

# ड्रग्जसाठी ओळखले जाणारे राज्य शिक्षणात अव्वल, महाराष्ट्र कितव्या स्थानी?

**मुंबई:** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार (एनईपी) परख संस्थेकडून घेण्यात आलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक सर्वेक्षणात महाराष्ट्र आठव्या स्थानी आला आहे, तर पंजाबने पहिला क्रमांक पटकावला आहे. या सर्वेक्षणात कोल्हापूर जिल्ह्याने सर्व इयत्तांमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला आहे. राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण २०२१ची तुलना करता इयत्ता नववीचा गणित विषय वगळता महाराष्ट्राच्या सरासरी संपादणुकीमध्ये तीन टक्के वाढ झाली आहे. गेल्या वर्षी चार डिसेंबरला झालेल्या या सर्वेक्षणात देशातील ८७ हजार शाळांमधील सुमारे २३ लाख विद्यार्थी सहभागी झाले होते. या सर्वेक्षणातून इयत्ता तिसरी, सहावी आणि नववीतील विद्यार्थ्यांचे भाषा, गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्र, परिसर अभ्यास या विषयांमधील विद्यार्थ्यांची संपादणूक तपासण्यात आली आहे. या सर्वेक्षणात राज्यातील चार हजार ३१४ शाळा, १३ हजार ९३० शिक्षक आणि एक लाख २३ लाख विद्यार्थी सहभागी



झाले होते. मुलांची संख्या ५१ टक्के असून, मुलींचा सहभाग ४९ टक्के इतका होता. सरकारी शाळांचे प्रमाण २९ टक्के, अनुदानित शाळांचे प्रमाण ३२ टक्के, तर खासगी शाळांचे ३३ टक्के आणि केंद्रीय शाळांचे सात टक्के होते.

इयत्ता तिसरीच्या संपादणुकीमध्ये पंजाबने अव्वल क्रमांक पटकाविला, तर महाराष्ट्राने सहावा क्रमांक पटकावला. इयत्ता सहावीमध्ये संपादणुकीमध्ये केरळने अव्वल स्थान पटकावले असून, महाराष्ट्र सातव्या स्थानी आहे. इयत्ता नववीमध्ये पंजाब अव्वल ठरले असून, महाराष्ट्राने दहावा क्रमांक पटकावला. इयत्ता सहावीच्या निष्कर्षानुसार, भाषा विषयात महाराष्ट्राची सरासरी ६२ टक्के असून, ती राष्ट्रीय सरासरीपेक्षा पाच टक्क्यांनी जास्त आहे.भाषा व सामाजिक शास्त्र विषयात मुली सरासरीपेक्षा चांगली कामगिरी करीत असल्याचे इयत्ता नववीच्या निष्कर्षांमध्ये दिसून आले आहे. ग्रामीण विद्यार्थी काही जिल्ह्यांमध्ये (उदा. कोल्हापूर, सातारा, रत्नागिरी) राष्ट्रीय सरासरीपेक्षा चांगले काम करीत असल्याचेही दिसून आले आहे.

# भारताच्या विजयाला चिटींग म्हणणाऱ्या इंग्लंडची बोलती बंद, ने घेतला मोठा निर्णय


भारताने दुसरा कसोटी सामना जिंकला आणि त्यानंतर इंग्लंडने टीम इंडियावर चिटींगचा आरोप लावला. भारताने हा विजय मिळवताना नियम झुकवले आणि चिटींग केली, असे इंग्लंडच्या आजी-माजी खेळाडूंनी आरोप करायला सुरुवात केली होती. पण या प्रकरणी आता इंग्लंडची बोलतीच बंद झाली आहे. कारण क्रिकेटचे नियम ठरवणाऱ्या मेरिलबोन क्रिकेट क्लबने (एमसीसी) एक मोठा निर्णय घेतला आहे. भारताविरुद्धच्या मालिकेतील दुसऱ्या कसोटी क्रिकेट लढतीच्या चौथ्या दिवशी आकाशदीपच्या वेगाने आत आलेल्या चेंडूवर जो रूट चकला आणि त्याच्या तिन्ही यष्टी तीन ताड उडाल्या. मात्र, आकाशचा तो चेंडू नोबॉल असल्याचे रडगाणे इंग्लंडमधील माजी क्रिकेटपटूंनी; तसेच माध्यमांनी सुरू केले. एवढेच नव्हे, तर त्याद्वारे भारतीय गोलंदाजांच्या प्रभावी कामगिरीवर पांघरूण टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला; पण आता मेरिलबोन क्रिकेट क्लबने आकाशचा तो चेंडू पूर्णपणे वैध होता, असा निर्णय दिला आहे. रूटला बाद करण्यासाठी आकाशने तो चेंडू क्रीझच्या एकदम उजवीकडे येत टाकला होता. क्रिकेटच्या नियमानुसार चेंडू टाकला जात असताना गोलंदाजाने क्रीझ पार न करणे आवश्यक असते. या क्रीझमधील कोणतीही रेषा पार न करण्याचे बंधन असते. आकाशनेही या नियमाचा भंग घेतल्याचा आक्षेप घेतला जात आहे. बीबीसीवर समालोचन करताना ॲलिसन मिचेल यांनी नेमका हाच मुद्दा घेऊन टीका केली. त्यांच्यासह अनेकांनी घेतलेला आक्षेप हा आकाशच्या गोलंदाजी करीत असताना मागे असलेल्या पायाबद्दल आहे. समालोचन कक्षात जोनाथन ट्रॉट यांनी हा चेंडू नो बॉल असल्याची शेरेबाजी केल्यावर रवी शास्त्री यांनी चेंडू वैध असल्याचे सांगितले होते. आयसीसीचे नियम करणाऱ्या एमसीसीने चेंडू वैध असल्याचे म्हटले आहे. भारताच्या विजयात मीठाचा खडा टाकण्याचा प्रयत्न इंग्लंड करत होती. पण आता एमसीसीने भारताने कोणतीही गोष्ट अवैध केलेली नाही, हे स्पष्ट केले आहे. त्यामुळे आता इंग्लंडची संपूर्ण जगासमोर लाज गेली आहे. त्यामुळे यापुढे भारताबाबत असं काही बोलताना ते नक्कीच विचार करतील, असे आता म्हटले जात आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पालिका निवडणुका डिसेंबरमध्ये? च्या मर्यादित संख्येमुळे तीन टप्प्यांत होणार निवडणुका...

**मुंबई :** राज्यातील विविध ६८७ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तीन टप्प्यांत घेण्याचे नियोजित असून, पहिल्या टप्प्यात ऑक्टोबरमध्ये पंचायत समिती, नगर परिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुका घेण्याची चाचपणी सुरू आहे. नोव्हेंबरमध्ये जिल्हा परिषदांच्या, तर सर्वांत शेवटी डिसेंबरमध्ये महापालिकांच्या निवडणुका होण्याची दाट शक्यता आहे. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची (ईव्हीएम) मर्यादित संख्या पाहता राज्य निवडणूक आयोगाने एकाच वेळी या निवडणुका घेण्यास असमर्थता दर्शविल्याची चर्चा आहे.एकाच वेळी सर्व स्थानिक



स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी लागणारी ईव्हीएमम उपलब्ध होत नसल्याने तीन टप्प्यांत या निवडणुका घेण्याचा प्रस्ताव असल्याची माहिती उच्चपदस्थ सूत्रांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारतीय जनता पक्षाच्या मंत्र्यांची मुंबईत नुकतीच बैठक घेतली. त्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या प्रस्तावित निवडणुकांच्या वेळापत्रकाबाबत चर्चा झाल्याचे सूत्रांनी सांगितले. सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचा आदेश दिला असून, त्यानुसार नगरविकास विभागाने सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रभागरचनेचा प्रारूप आराखडा तयार करण्याचा आदेश दिला आहे. महापालिकांच्या निवडणुका जानेवारीपर्यंत पुढे ढकलल्या जाऊ शकतात, असाही अंदाज आहे.

**ईव्हीएमची अडचण**

राज्यातील बहुतांश स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका प्रलंबित आहेत. सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकाच वेळी घेणे ईव्हीएमच्या दृष्टीने अडचणीचे ठरले आहे. सर्व स्थानिक स्वराज्य संस्था मिळून ६८७ संस्थांच्या निवडणुका घ्याव्या लागणार आहेत. त्यासाठी मोठ्या संख्येने ईव्हीएम लागणार असून, त्याचा आढावा घेण्यात येत आहे. ईव्हीएमची संख्या अपुरी असल्याने या निवडणुका तीन टप्प्यांत घेण्याचे नियोजन असल्याचा दावा सूत्रांनी केला आहे.राज्य निवडणूक आयोगाने सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना पत्र पाठवले असून, ११ जुलै रोजी व्हिडिओ कान्फरसिंगद्वारे बैठक बोलावली आहे. त्यामध्ये मतदार संख्या, मतदान केंद्रांची संख्या, ईव्हीएम, आवश्यक मनुष्यबळ तसेच ऐनवेळी उपस्थित होणाऱ्या मुद्यावर चर्चा करण्यात येईल, असे पत्र निवडणूक आयोगाचे उपायुक्त राजेंद्र पाटील यांनी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना पाठवले आहे.

## जिथे सर्वात मोठं खिंडार, तिथेच ठाकरे शोधणार आधार; बालेकिल्ला मिळवण्यासाठी परिक्रमा करणार...

**मुंबई :** ज्या भागाने नेहमीच ठाकरेंना साथ दिली. शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून ओळखला गेला. अशा कोकण विभागात उद्धव ठाकरे येत्या ऑगस्टमध्ये शिवबंधन परिक्रमा काढणार आहेत. रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यासाठी ही परिक्रमा असेल. गेल्या विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत ठाकरे गटाला कोकणात मोठा पराभव स्वीकारावा लागला आहे. लोकसभेत कोकणातील रायगड आणि रत्नागिरी, सिंधुदुर्ग या मतदारसंघातील उमेदवारांचा पराभव झाला होता. विधानसभेत तीनही जिल्ह्यातून भास्कर जाधव हे एकमेव आमदार निवडून आले आहेत.



२०२२ मध्ये एकनाथ शिंदेंच्या बंडानंतर शिवसेनेचे कोकणातील भरत गोगावले, उदय सामंत, दीपक केसरकर, योगेश कदम, थोरवे, दळवी या आमदारांनी उद्धव ठाकरेंची साथ सोडली होती. भास्कर जाधव, वैभव नाईक, राजन साळवी हे आमदार ठाकरेंसोबत राहिले होते. मात्र विधानसभा निवडणुकीत वैभव नाईक आणि राजन साळवी यांचा पराभव झाला. राजन साळवींनी काही दिवसातच शिवसेना शिंदे गटाची वाट निवडली. महाडच्या उमेदवार स्नेहल जगपात यांनीही घड्याळ हाती बांधले. वैभव नाईक मात्र ठाकरेंसोबत आहेत. एकदंर पक्षाला संघटनात्मक बळ देण्याची नितांत गरज आहे. यासाठीच उद्धव ठाकरेंकडून कोकणात शिवबंधनपरिक्रमेचा निर्णय घेतला आहे.उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे १९ वर्षांनंतर ५ जुलैला व्यासपीठावर एकत्र आले. उद्धव ठाकरेंनी आम्ही एकत्र आलो आहोत ते एकत्र राहण्यासाठी असे स्पष्टपणे सांगितले. राज ठाकरेंनी भविष्यातील युतीसंबंधी कोणतेही विधान केले नाही. आणि गेले दोन दिवस राज ठाकरेंनी मौन बाळगल्याने नेमकं त्यांच्या मनात काय सुरू आहे याचा ठाव लागत नाही आहे. युती झाल्यास ठाकरे ब्रँडची एक लाट निर्माण होऊ शकते असे राजकीय विश्लेषकांचे म्हणणे आहे. मात्र युती झाली नाही तर मात्र राज ठाकरे यांच्यापेक्षा उद्धव ठाकरेंसमोर मोठं आव्हान असेल. कारण त्यांनी बेधडकपणे शिंदे गटाला आणि भाजपला ललकारले आहे. पुढील निवडणुकांची पुर्वतयारी म्हणून उद्धव ठाकरे पक्षाला शिवबंधन परिक्रमेद्वारे बालेकिल्ल्यात बळ दिले जाईल. पुढील दिवसांत ही परिक्रमा उर्वरित महाराष्ट्रातही काढण्यात येऊ शकते.



## लिफ्टचा दरवाजा बंद केल्याचा राग; १२ वर्षीय मुलाला मारहाण, रहिवाशाचा प्रताप कॅमेऱ्यात कैद...

**अंबरनाथ:** लिफ्टचा दरवाजा बंद केल्याच्या रागातून पालेगाव भागात सोसायटीतील रहिवाशाने एका अल्पवयीन मुलाला बेदम मारहाण करत त्याच्या हाताला चावा घेतला. ही संतापजनक घटना लिफ्टमधील सीसीटीव्हीत कैद झाली असून, याप्रकरणी कैलास तनवाणी याच्याविरोधात शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, कैलासच्या पत्नीनेही या घटनेनंतर कौटुंबिक वादातून त्याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.अंबरनाथ पूर्वे च्या पालेगाव परिसरात पटेल जियम सोसायटी आहे. ४ जुलैला एक अल्पवयीन मुलगा सायंकाळी क्लासला जाण्यासाठी सोसायटीच्या लिफ्टमध्ये शिरला. तो दरवाजा बंद करत असतानाच कैलास तिथे आला. मात्र, आपल्याला पाहून मुलाने लिफ्टचा दरवाजा बंद केल्याच्या गैरसमजातून कैलासने, तू मोहित का दोस्त है ना?, अशी विचारणा करत थेट पाच वेळा त्याच्या कानशिलात लगावली. मुलाने बचावासाठी आपला हात पुढे केला असता कैलासने त्याच्या हाताचा चावा घेतला.

यावेळी लिफ्टमधील एका महिलेने या मुलाचा बचाव करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर, तुला आता लोकांनी वाचवले. नंतर बाहेर भेट, तुला चाकूने मारेन, अशी धमकी कैलासने मुलाला दिली. मारहाण करताना कैलासच्या हातात चावी आणि मोबाइल असल्याने मुलाला अंतर्गत दुखापत झाली आहे.

# ठाकरेंच्या एकीचं बळ, शिंदेसेनेत खळबळ; शह देण्यासाठी ऑपरेशन सुरु, लवकरच मोठा भूकंप?...

**मुंबई:** ठाकरेंच्या एकीची आणि त्यांच्या संभाव्य युतीची चर्चा असताना शिवसेनेची धाकधूक वाढली आहे. शिवसेना उबाठाला खिंडार पाडण्यासाठी आता शिंदेसेना पुन्हा एकदा ऑपरेशन टायगरला गती देणार आहे. ठाकरेंच्या शिवसेनेचे गळाला लावण्याचे प्रयत्न शिंदेसेनेकडून पुन्हा केले जाणार आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिंदेसेना ऑपरेशन टायगरला वेग देणार आहे. शिवसेना उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे गेल्या शनिवारी एका व्यासपीठावर सोबत आले. सरकारनं हिंदी भाषा सक्तीचा जीआर मागे घेतल्यानंतर दोन्ही ठाकरेंच्या पक्षांकडून विजयी मेळाव्याचं आयोजन करण्यात आले. त्या कार्यक्रमात दोन्ही ठाकरेंची भाषणं झाली. उद्धव ठाकरेंनी मनसेसोबत युतीचे स्पष्ट संकेत दिले. त्यानंतर आता शिंदेंची शिवसेना सावध झाली आहे. उद्धव ठाकरेंनी युतीसाठी हात पुढे केलेला आहे. पण अद्याप त्याला राज ठाकरेंनी प्रतिसाद दिलेला नाही. ठाकरे बंधूंची युती होण्याची दाट शक्यता लक्षात घेता शिंदेसेनेनं त्यांचा मुकाबला करण्याची तयारी आतापासूनच सुरु केलेली आहे. मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये शिंदेसेनेला ठाकरेंच्या युतीचा फटका बसू शकतो. त्यामुळे या पाचही ठिकाणी शिंदेसेनेचे नेते अधिक सक्रिय झालेले आहेत.शिंदेसेनेकडून ठाकरेंच्या शिवसेनेच्या नेत्यांशी संपर्क साधले जाऊ लागले आहेत. येत्या काही दिवसांत मुंबई, ठाणे, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नाशिकमधील विरोधी पक्षातील नेते आमच्या पक्षात येतील. कार्यकर्त्यांचेही पक्षप्रवेश होतील. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवण्यासाठी अनेक जण इच्छुक आहेत. निवडणुकांच्या तारखा जाहीर होण्यापूर्वी ही मंडळी पक्षांतर करतील, असं शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्यानं




टाइम्स ऑफ इंडियाला सांगितलं. आमच्या काही नेत्यांनी उबाठाच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांशी संपर्क साधले आहेत. आमचे नेते सातत्यानं त्यांच्या संपर्कात आहेत, अशी माहिती शिंदेसेनेच्या नेत्यानं दिली. विधानसभा निवडणुकीत शिंदेसेनेला घवघवीत यश मिळाल्यानंतर त्यांनी ऑपरेशन टायगर हाती घेत ठाकरेंचे अनेक शिलेदार गळाला लावले होते. विधानसभेला पराभूत झालेल्या अनेक नेत्यांना शिंदेसेनेत प्रवेश देण्यात आला

## सोन्यासारखी जागा गिरणी मालकांच्या घशात, आपले सरकार नाही म्हणून... आझाद मैदानात उद्धव ठाकरे कडाडले...

**मुंबई:** सोन्यासारखी जागा गिरणी मालकांच्या घशात घालण्यात आली असून गिरणी कामगारांच्या उरावर त्या ठिकाणी अदानीचे टॉवर बांधले जात आहेत. कामगारांना, पोलिसांना, सफाई कामागारांना मात्र शेलू, वांगणीला, देवनार डम्पिंग ग्राऊंडमध्ये घरे दिली जात आहेत. मात्र तुम्ही काळजी करू नका आपण अदानीलाच वांगणीला, शेलूला पाठवू, असे प्रतिपादन शिवसेना उबाठा पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी बुधवारी केले. आझाद मैदानात गेल्या चार दिवसांपासून विनाअनुदानित शिक्षकांचे आंदोलन सुरू असून सकाळीच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार यांनी आंदोलनस्थळी भेट दिली. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनीही आझाद मैदानात येऊन आंदोलकांशी संवाद साधत त्यांना पाठिंबा दर्शवला. यावेळी आदित्य ठाकरेही उपस्थित होते.ध्वनिक्षेपकातील तांत्रिक अडचणीमुळे उद्धव ठाकरे यांनी हातात मेगा फोन घेऊन आंदोलकांना संबोधित केले. आता आपण सगळ्यांनी मिळून भाजपला




असा करंट दिला पाहिजे की सत्तेच्या खुर्चीतून ते उडून पडले पाहिजेत. एकूणच महाराष्ट्रात अन्याय होत आहे. आपण सर्व मिळून एकवटलो तर त्यांना एकच धडा शिकवूया की हे वळवळ करायला शिल्लक राहणार नाहीत, असे ते म्हणालेकामगारांच्या उरावर टॉवर उभे केले जात असून सोन्यासारखी जागा गिरणी मालकाच्या घशात टाकली. ज्यांनी मुंबई मिळवून दिली त्यांना शेलू आणि वांगणीला पाठवले जात आहे. त्यामुळे गिरणी कामगार ना धारावी आणि कुर्ला मदर डेअरीच्या जागी जागा द्या. अदानीचे टॉवर शेलू, वांगणीला तसेच देवनार डम्पिंगवर बांधा, अशी आमची मागणी आहे. गिरणी कामगार, पोलिस आणि सफाई कामगारांना हक्काची जागा द्यायला पाहिजे. आपले सरकार सत्तेवर आले नाही म्हणून, नाहीतर तुम्हाला मोर्चा काढण्याची गरज पडली नसती, असेही ते म्हणाले.आम्ही दोन्ही भाऊ एकत्र आलो आहोत. आम्ही आमच्या राजकीय पोळ्या भाजत बसलो असतो; परंतु तसे केले नाही. प्रबोधनकारांचे आम्ही दोन्ही नातू. माझे आजोबा आणि बाळासाहेब; तसेच माझे काका श्रीकांत ठाकरे हे तिघेही संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात होते. आणि आमच्या डोळ्यांदेखत मुंबई तोडली जात असेल, मराठी माणूस भरडला जात असेल तर आम्ही नतद्रष्टासारखे भांडत बसू? त्यामुळेच आम्ही भांडणे मिटवून टाकलीफ, असेही उद्धव ठाकरे म्हणाले.

## मनसेच्या मोर्चाने गदारोळ, पोलिस आयुक्त मधुकर पांडेंची तडकाफडकी बदली, नवे आयुक्त कोण?

**मिरा-भाईंदर:** वसई-विरारचे पोलिस आयुक्त मधुकर पांडे यांची बुधवारी बदली करण्यात आली असून, त्यांच्या जागी निकेत कौशिक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मिरा-भाईंदरमध्ये मंगळवारी मराठीसाठी निघालेल्या मोर्चादरम्यान पोलिसांनी केलेल्या कारवाईमुळे तणाव निर्माण झाला होता. याच कारणास्तव पोलिस आयुक्त पांडे यांची उचलबांगडी करण्यात आल्याची चर्चा आहे.पांडे यांनी डिसेंबर २०२२मध्ये मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तपदाचा पदभार स्वीकारला होता. या पदावर ते अडीच वर्षांहून अधिक काळ कार्यरत होते. दोन महिन्यांपासून त्यांच्या बदलीच्या चर्चा सुरू होत्या. अखेर बुधवारी अपर पोलिस महासंचालकपदी ( प्रशासन) त्यांची बदली करण्यात आली. पांडे यांच्या जागी लाचलुचपत प्रतिबंधक विभागात अपर पोलिस महासंचालकपदी कार्यरत असणाऱ्या निकेत कौशिक यांची नियुक्ती करण्यात आली आहे.मिरा-भाईदरमध्ये मंगळवारी मराठीसाठी मोर्चाची हाक देण्यात आली होती. त्याला पोलिसांकडून परवानगी नाकारण्यात आली. यावरून राज्य सरकारवर टीकेची झोड उठली होती. यामुळे मधुकर पांडे यांची बदली करण्यात आल्याचे बोलले जात आहे. परंतु, बदलीच्या आदेशात कोणतेही कारण देण्यात आलेले नाही.मिरा-भाईंदरमध्ये अमराठी व्यापाऱ्यांच्या मोर्चाला उत्तर देण्यासाठी मंगळवारी मराठी बांधवांकडून मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चाला पोलिसांकडून परवानगी नाकारण्यात आली होती. तरीही आंदोलनावर ठाम राहण्याची भूमिका मराठीजनांकडून घेण्यात आली होती. त्यानंतर पोलिसांकडून मोर्चाचे विविध ठिकाणी लावण्यात आलेले फलक उतरवण्यात आले होते. मोर्चाच्या आदल्या दिवशी अनेकांना ताब्यात घेण्यात आले होते. यासह मोर्चाच्या दिवशी मोर्चास्थळी येणाऱ्या शेकडो मराठी बांधवांची धरपकड केली जात होती. त्यामुळे मोर्चात संघर्षाची स्थिती निर्माण झाली होती. या वेळी जनसमुदाय आक्रमक झाल्याने पोलिसांनी एक पाऊल मागे घेतल्याने नियोजित मोर्चा पार पडला. या मोर्चाला परवानगी नसल्याने मोर्चानंतर गुन्हे दाखल करण्यासारखी कठोर कारवाई केली जाते का, याकडे अनेकांचे लक्ष लागले आहे. मात्र, कठोर कारवाईबाबत सध्या कोणताही निर्णय झाला नसल्याचे एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने बुधवारी सांगितले.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# कोलवड आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृहात प्रवेश प्रक्रिया सुरू...

**जनसंचलन/ चिखली**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, कोलवड जि. बुलढाणा येथे शैक्षणिक सत्र २०२५-२६ करीता प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. बुलढाणा जिल्ह्यातील तसेच आजुबाजूच्या जिल्ह्यांतील पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन गृहपाल एस.एस. चौरपगार यांनी केले आहे. विद्यार्थ्यांनी १० जुलै २०२५ पर्यंत https://swayam.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरावा. अर्ज भरल्यानंतर आवश्यक कागदपत्रांसह मुदतीत वसतिगृह कार्यालयात प्रत्यक्ष सादर करणे आवश्यक आहे. अर्ज भरतानाच्या सूचनानुसार अर्जात स्वतःचा मोबाईल क्रमांक नोंदवावा. मोबाईल क्रमांक आधार व बँक खात्याशी जोडलेला असावा. नावाची नोंदणी करताना आधारकार्डवरील नावासारखेच तंतोतंत भरावे. अर्जासोबत पालक व विद्यार्थ्यांचे स्वयंघोषणापत्र जोडणे आवश्यक. त्याचा नमुना संकेतस्थळावर उपलब्ध आहे. प्रवेशासाठी कागदपत्रे: जातीचा प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, आधार कार्ड,मागील शैक्षणिक वर्षाचे गुणपत्रक, बोनाफाईड प्रमाणपत्र किंवा प्रवेश पावती, बँक पासबुक, दोन पासपोर्ट साईज फोटो, पालकांचे व विद्यार्थ्यांचे स्वयंघोषणापत्र (स्वरूप संकेतस्थळावर उपलब्ध). विद्यार्थ्यांनी व पालकांनी अर्ज भरताना दिलेली सर्व माहिती अचूक व सत्य असल्याची खात्री करूनच सादर करावी. चुकीची किंवा अपूर्ण माहिती आढळल्यास अर्ज फेटाळला जाऊ शकतो. अधिक माहितीसाठी आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, कोलवड बुलढाणा येथे संपर्क साधावा, असे गृहपाल यांनी कळविले आहे.

# कृषी योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी अनिवार्य...

**जनसंचलन/बुलडाणा**

कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांचा लाभ शेतकऱ्यांना मिळावा यासाठी शेतकरी ओळख क्रमांक १५ एप्रिल २०२५ पासून अनिवार्य करण्यात आले आहे. ज्या शेतकऱ्यांनी अजूनही शेतकरी ओळख क्रमांक बनवलेले नसेल, तर त्यांनी तात्काळ आपल्या नजीकच्या नागरी सुविधा केंद्र किंवा ग्राम कृषी विकास समितीकडे जाऊन नोंदणी करून शेतकरी ओळख क्रमांक बनवून घ्यावा, असे आवाहन कृषि उपसंचालक संजीवनी कणखर यांनी केले आहे. जिल्ह्यात प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेत एकूण ४ लाख ३४ हजार ४६८ लाभार्थी असून, त्यापैकी ३ लक्ष ५ हजार ४४७ शेतकऱ्यांनी आतापर्यंत फार्मर आयडी काढले आहेत. पीक कर्ज, पीक विमा, किसान क्रेडिट कार्ड, पीएम किसान योजनेचे अनुदान, नैसर्गिक आपत्ती मदत अशा शासनाच्या विविध योजनेसाठी फार्मर आयडी अनिवार्य आहे. शेतकरी ओळख क्रमांक अंतर्गत कृषी व संलग्न विभागाकडून शेतकऱ्यांच्या शेताची, आधार क्रमांकाशी संलग्न अशी माहिती एकत्र करून ङ्कफार्मर रजिस्ट्री तयार करण्यात येणार आहे. या माहितीच्या आधारे लाभार्थ्यांची अचूक निवड करून कृषी योजनांचा लाभ अधिक प्रभावी आणि पारदर्शक पद्धतीने वितरित करता येईल. शेतकरी ओळख क्रमांक तयार झाल्यानंतर शेतकऱ्यांना वारंवार प्रमाणिकरण करण्याची आवश्यकता राहणार नाही. तसेच सातबारा उतारा आधार कार्डाशी लिंक करून ठेवणे आवश्यक आहे. आवश्यक कागदपत्रे: आधार कार्ड, आधारशी लिंक असलेला मोबाईल क्रमांक, आधारशी लिंक असलेले बँक खाते, ७/१२ उतारा (सातबारा) किंवा नमुना ८. जिल्ह्यात आतापर्यंत एकूण ३ लाख ९९ हजार १९० शेतकऱ्यांचे शेतकरी ओळख क्रमांक अर्थात ङ्कफार्मर आयडीफ तयार करण्यात आले आहेत. शेतकरी ओळख क्रमांक शिवाय कृषी विभागाच्या कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ मिळणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपला शेतकरी ओळख क्रमांक त्वरित बनवून घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. मनोजकुमार ढगे यांनी केले आहे.

# राज्यात नागरी भागात तुकडेबंदी कायदा रद्द महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंची विधानसभेत घोषणा...

## आदर्श कार्यप्रणाली तयार करण्यात येणार ५० लाख कुटुंबांना लाभ


**वृत्तसंस्था/मुंबई**

राज्यातील महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणारा कायदा १९४७ नुसार ठराविक प्रमाणात कमी क्षेत्रफळ असलेल्या जमिनींची खरेदी-विक्री कायद्याने प्रतिबंधित होती. या पार्श्वभूमीवर १ जानेवारी २०२५ पर्यंत शहरी भाग, गावठाण पासून २०० मीटर पर्यंत आणि विविध प्राधिकरणांमधील भागात झालेले सर्व तुकड्यांचे व्यवहार मान्य करण्यात येणार आहेत. अशाप्रकारे एक गुंठेपर्यंत जमिन व्यवहारासाठी तुकडेबंदी कायदा रद्द केला जाईल, अशी घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंची विधानसभेत केली. याबाबतची अधिकची माहिती देताना मंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी १५ दिवसात आदर्श कार्यप्रणाली तयार करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे सुमारे ५० लाख कुटुंबांना जमीन व्यवहाराचा फायदा होणार आहे. १ जानेवारी २०२५ नंतर अशा व्यवहारांमध्ये प्रचलित नियमानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे. याबाबत सदस्य अमोल खताळ यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या सूचनेचा चर्चे दरम्यान सदस्य जयंत पाटील, विजय वडेट्टीवार, प्रकाश सोळंके, विक्रम पाचपुते, अभिजीत पाटील यांनीही



उपप्रश्न विचारत सहभाग घेतला. मंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, राज्य शासनाने ८ ऑगस्ट २०२३ रोजीच्या अधिसूचनेनुसार, मुंबई शहर, मुंबई उपनगर, अकोला आणि रायगड जिल्हे वगळता राज्यातील इतर ३२ जिल्ह्यांमध्ये स्थानिक क्षेत्र घोषित करून बागायतीसाठी १० आर आणि जिरायतीसाठी २० आर इतके प्रमाणभूत क्षेत्र निश्चित केले आहे. यामध्ये महानगरपालिका व नगरपरिषदा हद्दीतील क्षेत्रांचा समावेश करण्यात आलेला नाही. धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत १९४७ च्या कायद्यातील कलम ७, ८ व ८अ नुसार स्थानिक क्षेत्रामध्ये जमिनीचे तुकडे निर्माण होणार नाहीत, अशा पद्धतीनेच हस्तांतरण करता येते. मात्र, १ जानेवारी २०१६ रोजीच्या अधिसूचनेनुसार विशेष नियोजन प्राधिकरण किंवा नगरविकास प्राधिकरण अंतर्गत येणाऱ्या, तसेच प्रादेशिक योजनेत अकृषिक वापरासाठी निश्चित केलेल्या जमिनी या कायद्याच्या तुकडेबंदीच्या नियमांपासून वगळण्यात आलेल्या आहेत. तुकडेबंदी कायद्यामुळे अनेक व्यवहार प्रलंबित होते. नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. हा कायदा रद्द केल्यामुळे कमी क्षेत्राची खरेदी-विक्री करता येणार आहे. या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी महसूल विभाग व नगरविकास १ चे अपर मुख्य सचिव, जमाबंदी आयुक्त आणि नोंदणी महानिरीक्षक अशा चार अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय समिती गठित केली जाणार आहे. याबाबत लोकप्रतिनिधींच्या सूचना असतील त्यांनी अपर मुख्य सचिव, महसूल यांच्याकडे लेखी स्वरूपात सात दिवसात पाठवाव्यात असेही मंत्री श्री. बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.

# पिसाळलेल्या कुत्र्याच्या हल्ल्यात १४ जण जखमी



**जनसंचलन/बुलढाणा**

शहरातील संगम चौक, जिजामाता प्रेक्षागार, जयस्तंभ चौक, हिरोळे पेट्रोल पंप आदी परिसरात बुधवारी (दि. ९) सकाळपासून पिसाळलेल्या कुत्र्याने धुमाकूळ घालत महिलांसह पुरुष व लहान मुलांना चावा घेतला. या हल्ल्यात एकूण १४ जण जखमी झाले असून, त्यांच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. जखमी झालेल्यांमध्ये सुरज पवार, सुमन कोरडे, धुर्वी कोरडे, आकाश देठे, सतीश परसे, गौरव शेळके, कार्तिक नेमाने, भीमराव वाघ, शेख हाफीस शेख सलीम, देवीदास तांबे, सुरेखा लहाने, कुसुम पवार, हिमांशू गुप्ता आणि मोहन बोर्डे यांचा समावेश आहे. पिसाळलेला कुत्रा वेगवेगळ्या भागांमध्ये फिरत राहिला आणि अनेकांना चावा घेतल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले. विशेष म्हणजे, सकाळपासून दुपारपर्यंत जखमींनी रुग्णालयात येण्याचा ओघ सुरूच होता. या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीती निर्माण झाली असून, मनपाच्या पशुवैद्यकीय विभागाने तत्काळ लक्ष देण्याची गरज आहे.

# निकृष्ट जेवण असेल तर नरेंद्र मोदी जबाबदार!

## आमदार संजय गायकवाड यांच्यावर कारवाई व्हावी--संजय राऊत यांची मागणी!



वृत्तसंस्था/मुंबई
डाळ भात खराब असला तर त्याला जबाबदार कोण आहे? पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार असल्यामुळे ते जबाबदार असल्याची प्रतिक्रिया शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी दिली असून, गरिब कर्मचाऱ्याला मारहाण केल्याने आमदार संजय गायकवाड यांच्यावर कारवाईची मागणी त्यांनी केली आहे. वारंवार आपल्या वक्तव्यामुळे किंवा कोणत्या ना कोणत्या कृतीमुळे चर्चेत येणारे बुलढाण्याचे शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड पुन्हा एकदा राड्यामुळे चर्चेत आले आहेत. शीळे व निकृष्ट जेवण दिल्याच्या कारणावरून आमदार संजय गायकवाड यांनी आमदार निवास कॅन्टीनमध्ये राडा घातला आहे. यावेळी त्यांनी आमदार निवासमधील कॅन्टीन व्यवस्थापकाला देखील सुनावलं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, काल (मंगळवारी,ता ८) रात्री मुंबई स्थित आमदार निवासातील कॅन्टीनमध्ये बुलढाण्याचे शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी जेवणाची ऑर्डर दिली. त्यांना ऑर्डर प्रमाणे रूममध्ये जेवणही पुरवण्यात आलं. मात्र जेवणात देण्यात आलेलं वरण आणि भात हे शिळं होतं व त्याचा वास येत होता असा आरोप आमदार संजय गायकवाड यांनी केला. त्यानंतर गायकवाड यांनी थेट आमदार निवासातील कॅन्टीन व्यवस्थापकाला धारेवर धरलं व कॅन्टीन ऑपरेटरला मारहाण केली. दरम्यान या घटने प्रकरणी संजय राऊत म्हणाले की,आदिवासी पाड्यावर व सर्वसामान्य गोरगरिबांना हेच धान्य मिळते.या धान्याची क्वालिटी कशी आहे?हे सर्वश्रुत आहे.धन्य वाटपामध्ये प्रचंड भ्रष्टाचार आहे. परंतु कॅन्टीनमध्ये टॉवेल व बनियानवर गोरगरीब कर्मचाऱ्याला एका आमदाराने मारहाण करावी का?आणि आपली बाजू मांडून हे योग्य नाही असे सांगावे का?हे योग्य नसून तत्पूर्वी त्यांनी हा प्रश्न अधिवेशनात मांडायला पाहिजे होता.आपल्याला सनदशीर तक्रार करता येते.मात्र डाळ मिळाली नाही चांगली नाही,अशा कारणावरून राडा करण्यात काही अर्थ नाही. यासंदर्भात ट्विटरला मी प्रतिक्रिया टाकली असून राज्यात कायदा व सुव्यवस्था आहे की नाही ? हा प्रश्न उपस्थित केलेला आहे.याप्रकरणी संबंधित कर्मचाऱ्याला मारहाण झाल्याने आमदार गायकवाड यांच्यावर कारवाई व्हावी अशी मागणी करण्यात आल्याची माहिती संजय राऊत यांनी दिली आहे.

# दीपक केदार म्हणाले..आमदार संजय गायकवाड यांना बेड्या ठोका!

वृत्तसंस्था/मुंबई
मुंबईतील वेटरला एकटा समजू नका.. त्यांनी बंड केला तर सगळे आमदार एक दिवस धोक्यात जातील..आमदार संजय गायकवाड यांचे आमदार निवासात बनियनवर वेटरला मारहाण करणे हे बरोबर नाही.या गरीब वेटर यांच्या पाठीशी ऑल इंडिया पँथर सेना उभी आहे,अशी प्रतिक्रिया केदार यांनी सदर घटनेवर दिली. पुढे ते म्हणाले की,वेटरला मारून शौर्य गाजवून पाहाणाऱ्या संजय गायकवाड यांना तात्काळ अटक करायला हवी. व्हिडिओ काढून मारहाण करणे, मॉबलीचिंग करणे,दहशत निर्माण करणे हे आमदाराला शोभत नाही. आमदाराला सगळी प्रक्रिया माहीत असूनही त्यांनी गरिबाला मारहाण केली. त्यांना कसलीही दया माया नाही.याचा निषेध व्यक्त करून दीपक केदार



यांनी आमदार संजय गायकवाड यांना अटक करण्याची मागणी केली आहे.

# आता बुलढाणा सैनिकी शाळा नव्हे,राष्ट्रीय सैनिकी स्कूल!...

## नाव बदलास शासकीय मान्यता!

जनसंचलन/बुलढाणा
आता बुलडाणा सैनिकी शाळेचे नांव बदलले असून, राष्ट्रीय सैनिक स्कूल या नावाने ही शाळा ओळखली जाणार आहे. बुलडाणा येथील राजीव गांधी मिलिटरी स्कूल या निवासी सैनिकी शाळेचे नाव बदलण्यात आले आहे. यापूढे सैनिकी शाळेचे नांव राष्ट्रीय सैनिक स्कूल असे संबोधले जाणार आहे. नुकतेच या बदलास शासनाने मान्यता प्रदान केली आहे. स्व. विलासराव देशमुख शिक्षण प्रसारक व बहुद्देशीय संस्था, बुलडाणा द्वारा संचालित राजीव गांधी मिलिटरी स्कूल ही निवासी सैनिकी शाळा गत २५ वर्षापासून बुलडाणा येथील अजिंठा रोडवर कोलवड परिसरात कार्यरत आहे. नुकतीच भारत सरकारच्या संरक्षण विभागाने सदर सैनिकी शाळेला जोडून स्वतंत्र केंद्रीय सैनिकी शाळेस मान्यता दिली असून आता ही शाळा राष्ट्रीय पातळीवर कार्यरत असणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून संपूर्ण भारतात १०० सैनिकी शाळा स्थापन करण्याची केंद्र सरकारची योजना होती. त्यानूसार देशामध्ये विविध ठिकाणी केंद्र सरकारने स्वतंत्र केंद्रीय सैनिकी शाळांना मान्यता दिलेल्या आहेत. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातील बुलढाणा येथील राजीव गांधी मिलिटरी स्कूल या सैनिकी शाळेला स्वतंत्र केंद्रीय सैनिकी शाळेची मान्यता मिळाल्यामूळे बुलढाण्याच्या इतिहासात मानाचा तुरा खोवल्या गेला आहे.भारतीय सैन्यदलात जास्तीत जास्त अधिकारी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या माध्यमातून निर्माण व्हावे, या उद्देशाने देशपातळीवर संरक्षण विभागाच्या अंतर्गत सैनिकी शाळा स्थापन करण्याचा केंद्र सरकारने निर्णय घेतला होता. त्यानूसार संस्थेने २०२२ मध्ये रितसर प्रस्ताव सादर केला



होता. त्यानूसार केंद्रीय पथकाने शाळेला प्रत्यक्ष भेट देऊन सर्व सोईसुविधा व आतापर्यंत सैनिकी शाळेने देशाला दिलेल्या सैनिकी अधिकाऱ्यांची बाब लक्षात घेऊन तपासणी केली होती. त्यानूसार सदर मान्यता नुकतीच प्राप्त झाली असून चालु शैक्षणिक वर्षापासून देशपातळीवरील विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी दाखल होणार आहे. बुलढाणा जिल्ह्याला हा बहुमान मिळाल्यामूळे राज्यातील मोजक्या सैनिकी शाळेमध्ये सातारा व चंद्रपुर या केंद्रीय सैनिकी शाळेसोबत बुलढाणा जिल्ह्यातील सैनिकी शाळेची तुलना होऊ लागली आहे. दरम्यान आता ही शाळा राष्ट्रीय सैनिकी स्कूल म्हणून ओळखली जाणार आहे.

# शेतशिवारातील मोटार, केबल चोरट्याच्या मुसक्या आवळल्या, चोरट्यासह भंगार दुकानदारास अटक

जनसंचलन/ चिखली
पांबुळवाडी शिवारातील सुमारे दहा शेतकऱ्यांच्या बोअरवेल मोटारींचा केबल चोरून त्यातील तांब्याची तार जाळून भंगारात विकणाऱ्या चोरट्यांना चिखली पोलिसांनी अटक केली. या प्रकरणात चोरीचा माल विकत घेणाऱ्या भंगार दुकानदारालाही अटक करण्यात आली आहे. ८ जुलै रोजी संभाजीनगर येथील अभियानकुमार सहदेव निकाळजे यांनी चिखली पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यांच्या पांबुळवाडी शिवारातील शेतात वापरल्या जाणाऱ्या २५० फूट कोअर केबल, तसेच परिसरातील इतर नऊ शेतकऱ्यांच्या विहिरी आणि बोअरवेलमधून एकूण १,३७५ फूट वायर चोरीस गेल्याची माहिती दिली होती. या प्रकरणी पोलिसांनी कलम ३०३(२) भा.दं. वि. नुसार गुन्हा दाखल केला होता. दोन्ही आरोपींना अटक करण्यात महत्त्वाची भूमिका पोलिस पथकाने निभावली. चिखलीचे ठाणेदार संग्राम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डिटेक्शन बँचचे (डी.बी.) पोलिस उपनिरीक्षक समाधान वडणे यांच्याकडे तपास सोपवण्यात आला होता. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी राहुल अरुण इंगोले (रा. चिखली) यास ताब्यात घेतले. चौकशीत त्याने दोन अल्पवयीन बालकांच्या मदतीने चोरी केल्याची कबुली दिली. याप्रकरणातील चोरलेली केबल त्यांनी जाळून त्यातील तांब्याची तार चिखलीतील भंगार व्यापारी शेख अजीम शेख नजीर यास विकल्याचे उघड झाले. पोलिसांनी त्याच्या दुकानावर धाड टाकत १७ किलो ५०० ग्रॅम वजनाची तांब्याची तार, अंदाजे १७,५०० रुपयांची किंमत असलेला माल जप्त केला. दोघांनाही अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे. या कारवाईत सहायक फौजदार राजेंद्र काळे, पोलिस हेडकॉन्स्टेबल विजय किटे, अमोल गवई, प्रशांत धंदर, पंढरीनाथ मिसाळ, नीलेश सावळे यांनी कारवाईत सहभाग घेतला

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८